# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत—४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/१२७५/२०२१,            दिनांक : १२/१०/२०२१

## जाहिर प्रसिध्दी                12 OCT 2021

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने खरीप—२०२१ व रब्बी—उन्हाळी २०२१—२०२२ या हंगामाकरीता (१नोव्हेंबर २०२१ ते डिसेंबर २०२१) करावयाची आहे. सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामांसाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २६/१०/२०२१ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधनकेंद्र,
कर्जत—४१०२०१जि. रायगड

प्रत प्रसिध्दीसाठी—

१. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
२. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत,जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत. जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.
५. संकेस्थळ, डॉ.बा.सा.को.कृ. विद्यापीठ दापोली

*प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्राची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या* कामांचे दरपत्रक

## दरपत्रकाचा विहीत नमुना

दिनांक :

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक ....**

संदर्भ : जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/ /२०२१ दि.

महोदय,

वरील संदर्भीय जाहीर प्रसिध्दी पत्रकान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | सन २०२१ – २०२२ हंगामासाठी<br>( १नोव्हेंबर २०२१ ते डिसेंबर २०२१) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमूद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये.........................................<br>अक्षरी ......................................... |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तरी कृपया माझे दरपत्रक मंजुर करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही :

नांव :

पत्ता :

## ... कामाच्या अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूंरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

ठेकेदाराची सही :.............................................

ठेकेदाराचे नांव :.............................................

एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्प
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड

दि. ०१.११.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या कालावधीत करावयाच्या कामांची यादी.

१. प्लॉट नं.१०,११ कायम स्वरूपी भात प्रयोग, प्लॉट नं. ७ (NBCS)१० भात जाती गरजेनुसार आधारीत पीक पध्दती भात प्रयोग तसेच प्लॉट नं.३(A), ८,१२, Early, midlate, Late भात प्रयोग या पाच भात प्रयोगामधील भेसळ काढणे भात पिकाची निरीक्षणे घेण्यास मदत करणे. भात प्रयोग पिकाची कापणी करणे भारे बांधणे, वाहतुक करणे मळणी करणे, भात साफ करणे. जाती निहाय भाताची वजने करून मुख्य भांडारात जमा करणे.

२ प्लॉट नं. ५,७,८,१२,१३ मधील विविध भातच्या जातीचे कर्जत—३, कर्जत—४, कर्जत—७, कर्जत —८, कर्जत—९ इत्यादी भात बिजोत्पादन पिकामधील भेसळ काढणे कापणी करणे, भारे बांधणे, वाहतुक करणे मळणी करणे, भात साफ करणे. जाती निहाय भाताची वजने करून मुख्य भांडारात जमा करणे. बियाणे पेरणी

३. प्लाट नं. ३(A), ७,८,१०,११,१२ भात प्रयोगाचे माताचे नमुने व रोपांचे नमुने घेणे.

४. रब्बी—उन्हाळी २०२१—२०२२ या हंगामामधील प्रयोगाची लागवडीची पुर्व तयारी करणे.

५. प्रायोगिक पिकाची पेरणी व लागवड करणे.

६. बांधावर व मुख्य रस्त्यावरील गवतावर तणनाशक औषधाची फवारणी करणे तसेच प्रक्षेत्राच्या बांधावरील गवत काढणे. .

७. आयत्यावेळी उद्‌भवणारी इतर अनुषंगीक कामे करणे.

ठेकेदाराची सही :.......................................

ठेकेदाराचे नांव :..........................................